RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ३८] शुक्रवार, मार्च २४, २०२३/चैत्र ३, शके १९४५ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ९७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सार्वजनिक बांधकाम विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ मार्च २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मोटर वाहन कर अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२०२१/प्र.क्र.१५५/रस्ते-८.—महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम, (१९५८ चा ६५) यांच्या कलम २० ची पोट कलमे (१-अ), (१-ब), (१-क), (१-ड) आणि (१-इ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याला समर्थनीय करणाऱ्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे घोषित करते की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर मे. कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, इंदौर यांच्या मार्फत सुधारणा केलेल्या सोलापूर-औरंगाबाद-धुळे रस्त्याचा चाळीसगांव शहराबाहेरुन जाणाऱ्या किलोमीटर ०/००० ते ११/६१८ या सुधारणा केलेल्या वळण रस्त्याची व त्यावरील पूल व रेल्वे उड्डाण पूलाचा वापर करणाऱ्या खालील अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारांच्या मोटार वाहनांवर आणि वाहनांकडून ओढून नेल्या जाणाऱ्या अनुयानांवर स्तंभ (३) मध्ये त्यांच्यासमोर विनिर्दिष्ट केलेल्या दराने व विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीकरिता दिनांक २५ मार्च २०२३ ते दिनांक ११ जून २०२४ या कालावधीकरिता वर उल्लेख केलेल्या वळणरस्त्यावरील किलोमीटर ४/००० येथील पथकर आकारणी नाक्यावर पथकर आकारण्यात यावा.

**अनुसूची**

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | पथकराचे प्रती फेरीचे दर (रुपये) २५ मार्च २०२३ ते ११ जून २०२४ |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | स्कुटर, मोटार सायकल, चालका व्यतिरिक्त तीन प्रवासी वाहन क्षमता असलेल्या ऑटोरिक्षा, रिकाम्या ट्रॉलीसह ट्रॅक्टर. | पथकर नाही |
| २ | मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) मध्ये नमूद केल्याप्रमाणे हलकी मोटार वाहने,- | |
| | (अ) कार, जीप, टाटा सुमो, ट्रॅक्स, कमांडर व इतर तत्सम (चालक वगळून १२ प्रवासी क्षमता असलेली) वाहने, वाहन चालक वगळून सहा आसनी प्रवासी रिक्षा (टमटम). | (पथकरातून सूट) निरंक |
| | (ब) मिनी बस किंवा तत्सम वाहने (चालका व्यतिरिक्त १२ पेक्षा अधिक आणि २० प्रवासी क्षमते पर्यंत) आणि अनुक्रमांक ३ व ४ मध्ये नमूद नसलेली माल वाहतूक करणारी वाहने. | ७५ |
| ३ | ट्रक, बस. | १५० |
| ४ | मोटार वाहन अधिनियम, १९८८ (५९ चा १९८८) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे व अनुक्रमांक ३ मध्ये नमूद केलेली वाहने वगळून अवजड वाहने. उदा. ट्रक ट्रेलर, दोनपेक्षा अधिक आसांची वाहने इत्यादी. | २६० |

**टीप :-**

१. पथकराच्या दरात खालीलप्रमाणे सूट देण्यात येईल :—

अ. एखाद्या वाहन धारकाने ५० कुपन्स असलेली पथकर पुस्तिका आगाऊ खरेदी केल्यास त्यास पुस्तिकेच्या किमतीमध्ये अनुक्रमे १० टक्के सवलत देण्यात येईल.

ब. एखाद्या वाहन धारकाने १०० कुपन्स असलेली पथकर पुस्तिका आगाऊ खरेदी केल्यास त्यास पुस्तिकेच्या किमतीमध्ये अनुक्रमे २० टक्के सवलत देण्यात येईल.

क. वारंवार प्रवास करणाऱ्या वाहनांसाठी.—

(१) परतीच्या प्रवासाचे व दैनिक पासाचे दर हे त्या वाहनाच्या एकेरी पथकर दराच्या अनुक्रमे दीड पट व अडीच पट राहतील. परतीचा व दैनिक पास ज्या दिनांकास आला असेल त्या दिवशीच्या रात्री १२-०० वाजेपर्यंत वैध राहील.

(२) मासिक पासाचे एकेरी दर प्रवास दराच्या ५० पट राहतील

२. खालील वाहनांना पथकरातुन सुट देण्यात येईल.

(१) अति महत्त्वाच्या व्यक्ती जसे भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यपाल, लालदिव्याच्या वाहनातून प्रवास करणारे लोकप्रतिनीधी.

(२) लोकसभा व राज्यसभेचे विद्यमान सदस्य तसेच महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषदेचे विद्यमान सदस्य प्रवास करीत असलेली वाहने.

(३) केंद्र व राज्य शासकिय वाहने.

(४) पोलीस दलाची वाहने.

(५) लष्करी वाहने.

(६) टपाल व तार खात्याची वाहने.

(७) रुग्णवाहीका.

(८) शववाहीका.

(९) अग्निशमन दलाची वाहने.

३. या प्रयोजनाकरिता सोलापूर-औरंगाबाद-धुळे रस्त्याचा चाळीसगांव शहराबाहेरुन जाणाऱ्या किलोमीटर ४/००० येथे बांधलेल्या पथकर नाक्यावर वर नमूद केलेल्या कालावधीकरिता पथकर गोळा करण्याचा व पथकराची संपूर्ण रक्कम वसूल करण्याचा आणि ठेवून घेण्याचा हक्क मे. कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, इंदोर यांना प्रदान करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**संजय द. दशपुते,**
शासनाचे सचिव.

## PUBLIC WORKS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 24 March 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MOTOR VEHICLES TAX ACT.

No. PPP-2004/CR-267/Road-8.—In exercise of the powers conferred by sub-sections (*1-A*), (1-B), (1-C), (1-D) and (1-E) of section 20 of the Maharashtra Motor Vehicles Tax Act ( LXV of 1958), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby declares that the toll shall be levied on the classes of motor vehicles specified in column (2) of the Schedule appended hereto and on the trailers drawn by such motor vehicles, passing over the section of the Chalisgaon Bypass Road on the Solapur-Aurangabad-Dhule Road improved by the Maharashtra State Road Development Corporation under the 'Build Operate and Transfer (BOT) Scheme' and also over the bridges and railway over bridge, constructed on the said bypass in Kilometre 0/000 to 11/618, by M/s. Kalyan Toll Infrastructure Limited, Indore at the rates and for the periods specified against each of the said motor vehicles in column (3) of the said Schedule, with effect from the 25th March 2023 to 11th June 2024 at the toll collection centre constructed at kilometre 4/000 on the above mentioned bypass road.

*Schedule*

| Sr. No. | Particulars of Motor Vehicles | Rate of Toll per trip (In Rupees) |
|---|---|---|
| | | 25th March 2023 to 11th June 2024 |
| (1) | (2) | (3) |
| 1 | Motor Cycle, Scooter, Moped, Tractor and Tractor with unladen trolley, Three seater Auto Rickshaw excluding driver. | Nil |
| 2 | Light Motor Vehicles as defied in the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988). | |
| | (A) Six Seater Auto Rickshaw (Tum Tum) excluding driver, Motor Car, Jeep (having carriage capacity up to twelve passengers excluding driver) such as Tata Sumo, Trax, Commander etc. | (Exempted from Toll Fee) Nil |
| | (B) Mini Bus (having carriage capacity of more than twelve and up to twenty passengers, excluding driver) and vehicles carrying goods except those mentioned in entire at serial numbers 3 and 4. | 75 |
| 3 | Trucks Buses | 150 |
| 4 | Heavy Motor Vehicles as defined in the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988) such as Trucks, Multi-Axle vehicles, etc. except vehicles covered by the entry at serial number 3 above. | 260 |

*Notes.*—

1. Concession in rates of toll are as given below, namely :—

(*a*) 10 per cent. rebate will be given to the purchaser of booklet containing 50 coupons in advance.

(*b*) 20 per cent. rebate will be given to the purchaser of a booklet containing 100 coupons in advance.

(*c*) Passes for frequently travelling vehicles.—

(*i*) Return and daily pass will be 1.5 times and 2.5 times of their respective one way travel rates. The pass will be valid up to 12-00 hours midnight of the day on which the pass is issued.

(*ii*) Monthly pass will be 50 times of their respective one way travel rates.

2. The following types of vehicles are exempted from payment of toll, namely :—

1 VVIP vehicles carrying President of India, Vice-President of India, Governor of State, Public Representatives entitled for red lamp on their vehicles.

2 Vehicles carrying sitting Members of Parliament, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council.

3 Central and State Government Vehicles.

4 Police Vehicles.

5 Defense Vehicles.

6 Vehicles of Posts and Telegraph Department.

7 Ambulances.

8 Hearses.

9 Fire fighting vehicles.

3. For the purpose of this notification, M/s. Kalyan Toll Infrastructure Limited, Indore is authorized to collect and retain the amount of toll at the toll collection centre Constructed at kilometre 4/000 on the Chalisgaon Bypass Road on the Solapur-Aurangabad-Dhule Road for the above mentioned period.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY D. DASHPUTE,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.